तरुण भारत
Akola Main | 2025-08-23 | Page- 12
epaper.tarunbharat.net

# जनसुरक्षा शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



जनसुरक्षा शिबिरात मार्गदर्शन करताना मान्यवर

◆ **वाशीम, २२ ऑगस्ट**

स्टेट बँक ऑफ इंडिया व जिल्हा अग्रणी बँक, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने कारंजा येथे जनसुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरीकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक संचालक, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नागपूर सचिन वाय. शेंडे हे होते. या प्रसंगी अंजना श्यामनाथ, उपमहाप्रबंधक शशी रंजन, क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंह, उपमहाप्रबंधक, किसले कुमार तसेच जिल्हा व्यवस्थापक हर्षल चितळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कारंजा येथील सर्व बँक शाखा प्रमुखांनीही शिबिरात सहभाग घेतला. विविध ग्रामपंचायतींमधून दोनशेहून अधिक नागरिकांनी हजेरी लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अध्यक्षीय भाषणात सचिन वाय. शेंडे यांनी नागरिकांना बँक खात्याची केवायएसी पूर्ण करून प्रधानमंत्री सुरक्षा विमा व जीवन ज्योती विमा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपमहाप्रबंधक शशी रंजन यांनी अटल पेन्शन योजनेचे महत्व स्पष्ट करत सर्व युवकांना त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक यशवीर कुमार यांनी विविध योजनांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे अटल पेन्शन योजने अंतर्गत वाशीम जिल्हयाने राज्यात प्रथम स्थान मिळविल्याची गौरवाची नोंद त्यांनी या वेळी केली. कार्यक्रमाचा समारोप क्षेत्रीय व्यवस्थापक आशिष कुमार सिंह यांनी सर्वांचे आभार मानून केला.

◀(तभा वृत्तसेवा)

Powered by Bharati Web